म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १६०
१८८०

81

काव्य

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्रमांक १६०
लेखक म. मो. कुंटे
सन १८८०
पुस्तकाचें नांव राजाराम महाराज छत्रप… नावाची कविता

र-मं-१०६६

# A SHORT POEM

ON

## RÁJÁRÁMA MAHÁRÁJA CHHATR[illegible]ATI

OF KOLÁPOOR.

# राजाराम महाराज छत्र[illegible]ति

नांवाची

ही लहान कविता

## महादेव मोरेश्वर कुंटे, बी. ए.

कोलापुर हैस्कूलचे हेडमास्तर

## त्यांनीं

रचून प्रसिद्ध केली.

---

॥ ठेविलें अनंतें तैसेंच रहावें ॥
॥ चित्तीं असों द्यावें समाधान ॥
तुकाराम.

किंमत चार आणे.

ग्रं.७३१०५
८३९

Janardan Balaji Modak

Graduate of the

University of

Bombay

3rd March 1871.

Poona J B Modak

ठाणे.

# A SHORT POEM

ON

# RÁJÁRÁMA MAHÁRÁJA CHHATRAPATI

OF KOLÁPOOR

COMPOSED AND PUBLISHED

BY

M ÁDEVA MORESHVAR KUNTE **B. A.**

EAD MASTER, HIGH SCHOOL, KOLÁPOOR.

**BOMBAY:**

PRINTED AT GANPAT CRISHNÁJI'S PRESS

BY NÁRO KRISHNA DUMÁLE BY ORDER OF THE EXECUTORS.

1870.

*Price Four Annas.*

काव्य ८१

# राजाराम महाराज छत्रपति

नांवाची

ही लहान कविता

महादेव मोरेश्वर कुंटे, बी. ए.

कोलापुर हैस्कूलचे हेडमास्तर

त्यांनीं

रचून प्रसिद्ध केली.

---

मुंबई.

गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत एक्झिक्युटर्स

यांच्या हुकुमावरून ना० कृ० दुमाले

यांणीं छापिली.

इसवी सन १८७०

किंमत चार आणे.

TO

THE MEMORY OF

RÁJÁRÁMA MAHÁRÁJA CHHATRAPATI OF KOLÁPOOR

WHO WAS

THE PRIDE OF HIS DISTINGUISHED FAMILY,
THE FLOWER OF THE MARÁTHÁ PRINCES,
AND THE HOPE OF EDUCATED NATIVES &
OF THE ENGLISH GOVERNMENT,

THIS SHORT POEM

IS GRATEFULLY INSCRIBED.

कोलापुरचे राजाराम महाराज छत्रपति

यांस

त्यांच्या सद्गुणाची आणि मधुर स्वभावाची
आठवण रहावी म्हणून

ही

लहानशी कविता

कृतज्ञतापूर्वक अर्पिली आहे.

# PREFACE.

——ooo——

This short poem is an elegy on His Highness, Rájàrám Rájá Chhatrapati of Kolapore. He was born, 12th April 1850. His father was a small Sardár holding a small estate worth ten thousand rupees a year; his mother was the elder sister of His Highness, Shiváji Mahàráj Chhatrapati known in Kolápore as Bábà-Sàhib Maháràj. When he was a child, his mother died. He was brought up under the direct supervision of his elder uncle who afterwards adopted him. When young, Rájárám Mahàràj exhibited an intelligence, a sharpness and an aptitude which early attracted the attention of his elder uncle, and which inspired him with great hopes. He was the ornament of the infant School in a part of the palace where children alone were taught. His uncle Bàbá Sáhib paid particular attention to the education of Ràjàràm Mahàräj Chhatrapati, who was called by the courtiers Tàtià Sáhib. Though taciturn and lenient, his uncle opened his heart copiously, spoke his mind impressively and showed a strictness, of which he did appear capable to ordinary observers, whereever Tàtià Sàhib's welfare was concerned ; for his taciturnity was the result of vedantic beliefs, and his leniency sprang from his want of faith in the powers and capacities of man. He never knew anger. Nothing could vex him into open irritability. He never said or did any thing which could displease any body from the most insignificant personal attendant to the highest state functionary. Quiet and content, he ruled on, apparently indifferent to what was passing about him. He was, however, exceedingly attached to Tàtià Sáhib and early saw in him his own successor. Tàtià Sàhib was adopted a short time before the death of his uncle. But Tàtiá Sàhib seemed to inherit all the principal traits of his adoptive father. On the death of this Ràjà, the British

government assumed the direct administration of the state of Kolàpore. Colonel George Sligo Alexander Anderson was appointed Political Agent. Under his fostering and fatherly care, the young Ràjà received an education and a training, worthy of a Maràthá prince, a descendant of the illustrious Shivàji. Captain W. West, guided by the Political Agent, laid down a plan and a system of instruction which combined physical, moral and intellectual education and sought to develop manliness, selfconfidence and noble aspirations rather than a debilitating intellectuality which puffs up the mind and produces captious and eccentric pedantry so common among those who have received merely a scholastic education. Isolated from the influences of the palace and of the town, and associated with those who could communicate pure impulses, the young prince worked hard night and day, acquired a good knowledge of the English language and grew up to man's estate. The effects of education on his mind were appreciation of the good wishes of Britain ; admiration of the learned and the brave ; insatiable thirst after knowledge of all kinds ; great affability joined to a modesty and a purity to which every Indian prince is a stranger ; correct notions of what a King is, and what is expected of him ; and philanthropic ambition. To carry out all these, and to extend his knowledge, he sought to visit Europe. When he had carefully seen London and noticed the working of the parliament ; when he had visited the great seats of learning in England ; when he had travelled through a part of Scotland and Ireland; when he had trodden the famous field of Waterloo which affected and inspired his mind ; when he was just about to bid farewell to Europe, he breathed his last in Florence and was burnt on the banks of the Arno, 30th November 1870. Oh ! what a destiny in store for a Maráthá prince of the nineteenth century ! The news of his death passed through the Maràthà nation and educated Hindus like a blast of chilling cold, and seemed to benumb every body. The ambition of the prince was to fulfil the expectations of his teachers ; to set an example to his brother-princes ; to discharge his arduous duties

peaceably, energetically and beneficially, and to seek the good of his ignorant countrymen and to give a new direction to the war-like and restless Maràthás by affording ample scope to their mental and physical energies. But such was not the will of the Almighty, the great dispenser of justice and good. May the example set by Ràjàràm Mahàràj Chhatrapati in his youth be duly appreciated by other princes in India ! May his name inspire many Maráthà princes and Sardárs!

16 th December 1870

M. M. K.

Janardan B. [illegible]

# प्रस्तावना.

कोलापुरचे राजाराम महाराज छत्रपति मृत्यु पावले, यागोष्टीनें कवीला फारच दुःख झालें. त्या दुःखाचा उमाळा तुंबवितां येईना ह्मणून ही लहानशी दुःखप्रदर्शक कविता रचली आहे. वाचकहो, त्या राजाराम महाराज छत्रपतीचा स्वभाव किती गोड; चाल किती सरळ आणि साधी; अंतःकरण किती निर्मळ, आणि भाषण किती आनंदकारक होतें— हें या कवितेवरून तुमचे ध्यानांत आलें, आणि छत्रपतीची तुह्मांस वारंवार आठवण झाली, ह्मणजे कवितेचा हेतु सफळ झाला असें कवि समजेल.

तारीख १६ दिसेंबर
सन १८७०.

महादेव मोरेश्वर कुंटे.

॥ ठेविलें अनंतें तैसेंच रहावें ॥
॥ चित्तीं असों द्यावें समाधान ॥ १ ॥

तुकाराम.

सं - काव्य
८३१ ७१
मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. २२४

# राजाराम महाराज छत्रपति.

प्रकृतीचा धांवा.

प्रकृति तूं बनलीस अनंत हें.
जग, खगोल, तुझे गुण बाह्य. हे!
मन, मनोगम, अंतर गोल हा
तुज मधून निघे अवघा. अहा! १
हे सृष्टिरूपा! बहुरंग गोला!
हे चित्तसंतोष! अचिंत्य मूला!
तूं सत्व, तूं तत्व चलाचलाचें.
तूं शांति, तूं सौख्य खरें जिवाचें. २
मला भेर तूं गे! मला शक्ति दे गे!
तुझें रूप माझ्या मनीं गोड लागे.

घाटमाथा.

रमूं दे मला. घाटमाथा इथें हा.
दऱ्या ह्या, दरे हे, मधें वृक्ष. आहा! ३
किती माजलें रान! झाडी विचित्र!
तळीं डोंगरांच्या सुविस्तीर्ण चित्र.
कड्याला कडा खेटला. थोर दाटी.
कशी रांग लागे! दिसे मौज मोठी. ४
बहुत डोंगर हे. शिखरें किती!
झुळझुळे जळ; ओहळ चालती.
मधमधून नदी निघती पुढें.

जवळ कोंकण. रंग किती चढे ! ५

मावळी.

इथें मावळी नांदले; सिद्ध झाले.
इथें शौर्य आलें; लढाया निघाले.
मनीं धैर्य ज्यांच्या; रणीं शौर्य ज्यांचें;
जनीं कीर्ति ज्यांची; असे वीर साचे. ६
जसा अग्नि पेटे; जसा वायु चाले;
जसा पूर " धोंधों;" तसे वीर गेले.
जिताया निघाले; मराया निघाले.
जणों कां घरीं, ते रणीं शूर आले. ७

शिवाजी, राजाराम महाराजाचा मूळ पूर्वज.

मनीं त्वेष ज्याच्या, जणों आग लागे.
पुढारी शिवाजी, निघे शूर संगें.
धरी तीक्ष्ण तर्वार हातांत वीर;
निघाला पुढें शूर वैऱ्यां समोर. ८
मनीं भीति ज्याच्या; मनीं शांति ज्याच्या,
करी लोभ लोकांवरी. गोड वाचा.
जिती क्रोध कीं काम; तो दांत झाला.
मनीं शांत होतां, लढाया निघाला. ९
जनीं शांत आहे; मनीं युद्ध मांडी;
सहा शत्रु जिंकी; मनीं काम कांडी;
असा साधु चाले. कसा वीर चाले ?
मनीं शांत होतां, रणीं युद्ध केलें. १०

राजाराम महाराज.

राजारामा ! कीर्ति ही पूर्वजांची.
योद्धे मोठे! शौर्य शत्रूंस जांची.
राजारामा ! दुःख झालें जनाला.
गेलासी तूं. शोक भाजी मनाला. ११

दत्तक घेतलेले वडील.

तुझा रे ! पिता सुज्ञ होता हुशार.
कळे सर्व त्याला. मनीं शांत फार.
विचारीं बसावें. मनीं फार ध्यावें-
कसें सौख्य मीं ह्या प्रजेला करावें. १२
करी न्याय; अन्याय ठावा न त्याला.
पुरावा पहातां कळे मर्म ज्याला.
पुढें बोलतां गुंतती कीं वकील.
तरी ठाउकें मुख्य त्याला हशील. १३
मनीं खोल भारी. न लागेच अंत.
धरी सर्व ध्यानांत, ठेवी मनांत.
सदा शांत, साधा, नसे राग ज्याला.
अकल्याण ठावें नसे ह्या जनाला. १४
जपी द्रव्य भारी, करी संग्रहाला.
रची युक्ति कीं द्रव्य यावें गृहाला.
मनीं राग येतां, मनीं त्यास ठेवी.
जनीं दाखवी वीट, ही युक्ति ठावी. १५
राजारामा ! पुत्र तूं गोड भारी.
वाटे, होती ही उदासीन स्वारी.

येतां जातां लाड ठावा न त्याला.
आहे कोणी मूल, वाटे जनांला. १६
तुझें चित्त कांपे, तुला धाक भारी,
तुला गोड ऐसी न कीं हाक मारी.
धरी धारकीं लागण्या योग्य शाळा,
जरी धाकटा अज्ञ होतास. बाळा! १७
तरी लोभ मोठा- तरी भीति मोठी.
कथा एक ठावी मला. ही न खोटी.
तुला मंदिरीं गाढ रे! झोंप आली.
नसे शेज खाशी. असे रात्र झाली. १८
सदा मंदिरीं तेवतो दीप नीट.
अशी चालती रीति आहे जुनाट.
नसे दीप कोठें. पडे अंधकार.
पिता सुज्ञ कावे. तुझा लोभ फार. १९
मनीं अंतरीं रे! तुझी भीति रंगे.
तुला वागवी बाह्यरीत्याच रागें.
लळा फार होता. दया फार होती.
मनीं लाड, माया मनीं फार होती. २०

बाळपण. गेली तुझी बाळपणींच माय.
ती राजकन्या उरली न. हाय!
माता कसी हें तुज काय ठावें?
तूं राजवाड्यांत सदा रहावें. २१

तुला बाळसें फार रे! गोड होतें.
तुझें रूप आतां मनीं सर्व येतें.
पळावें लंडाडां; धरावें मुलांला.
जिथें राजवाड्यांत ती बाळशाला. २२
चिमुकलीं शिकतात मुलें जिथें.
जवळ मंडप सुंदरसा तिथें.
सकळ अज्ञ मुलें दिसती कशीं?
दुडदुडां पळती हरिणें जशीं. २३
येती फुलें दाट. गणेशबाग.
पाणी मधें. काय सुरेख रंग!
चक्रा प्रमाणें फिरवून पाणी
कोणीहि आनंद मुलांत आणी. २४
कारंजें हें छान आहे समोर.
पाणी चाले. शोभती बाग फार.
त्याच्या मध्यें चक्र आहे मजेचें.
पाणी जेथें नागमोडींत नाचे. २५
मुलांनीं जमावें, तिथें त्वांहि यावें,
फिरावें, बसावें, मनीं तृप्त व्हावें.
किती खेळ व्हावे! किती नाचणें तें!
मनीं सर्व येतां, मला दुःख होतें. २६
ती बाळशाळा तुज गोड लागे.
रे! खेळतांना बहु चित्त रंगे.
तो काळ जाऊनहि काळ आला.

हा ! हा! गड्या! त्रास उदंड झाला. २७
आह्मां मधें तूं मिसळून जावें.
आह्मां मधें फार सुखें फिरावें.
रे ! मित्रसें त्वां मग वागवावें.
तो काळ जातां मग तूंहि जावें. २८
शाळेंत जेव्हां लुटती मिठाई.
तेव्हां मुलें रे ! रचती लढाई.
तेव्हां तुला न्याय कसा कळावा ?
तेव्हांच कल्होळ मिटून जावा. २९
मुलें नाचतांना तुला मौज लागे.
तुझ्या सर्वदा हौस चित्तांत वागे.
कितींनीं हसावें ! कितींनीं रुसावें !
कितींनीं बसावें ! असे रंग व्हावे. ३०
हे रंग रे ! बाळपणींच झाले.
हे खेळ तूं सोज्वळ फार केले.
राजा ! तुला मृत्यु धरून नेतां;
रे ! दुःख चित्तीं उपळेच आतां. ३१

स्वरूप. तुझी मूर्ति डोळ्यां पुढें येतसे कीं.
तुझी हास्यचर्या दिसे गोड लोकीं.
तुझे गोलसे गाल, डोळे विशाळ.
तुझें भव्य, तेजाळ होतें कपाळ. ३२
तुझी गोड वाचा सदा सौख्य वर्षी

अहा ! काळ आला विसावेच वर्षी !
तुझ्या जोर अंगांत होता उदंड.
तुझी रुंद छाती; तुझे गोल दंड. ३३
तुझा शूर कुर्रा. तुझा वर्ण गोरा.
तुझी चाल साधी. असा रंग सारा.
तुझें चित्त मोठें, तुझी धांव मोठी.
सदा नांदलें रे ! तुझ्या धैर्य पोटीं. ३४
तुला गोड विद्या मनीं फार लागे.
तुला काळजी ही—कसी कीर्ति रंगे.
तुझी कीर्ति झाली—तुझें नांव झालें.
तुझ्या आज त्यागें जनीं दुःख केलें. ३५

नित्यकृत्य. अर्धी स्नान संध्या. सकाळीं उठावें.
पुढें देवपूजा. मनीं शांत व्हावें.
शिकावें, झटावेंहि विद्या कराया.
असा छंद. मोठी तुझी हौस, राया ! ३६
पुढें थोडकीं वृत्तपत्रें पहावीं.
कुठें काय चाले, असी हौस यावी.
रिकामा जरा काय होतांच राया !
तुझ्यारे ! पुढें बाळ येती बसाया. ३७
जिची सूक्ष्म मुद्रा, जिची गोड चर्या;
जिची चंद्रशोभा, तिची फार माया.
नसे राग ज्याला. असे पुष्ट अंग.

सदा सौख्य ज्याला. मनीं चैन रंग. ३८
नको फार विद्या, सुचे खेळ भारी.
असा मूल येतां, खुले फार स्वारी.
सवें जेवतां दोन बाळें असावीं.
पुढें भोजनीं रे ? किती मौज व्हावी ! ३९
तोंडांत चावून विड्यास त्वां कीं,
द्यावा मुलीला रस गोड लोकीं.
तेव्हां तिला मौज उदंड व्हावी.
ही रीति त्वां रे ! बहु आचरावी. ४०
हनुवटी धरतां मुलगी खुले.
हसत तांबुल गोड तिला मिळे.
खुदकिनी हसतां मुरडे, फिरे,
मधुर चित्र दिसे रमतां खरें. ४१
पुन्हा त्वां बसावें, पुन्हा त्वां शिकावें.
पुन्हा पाहतां ग्रंथ चित्तीं रिझावें.
असा काळ जावा. मनीं मौज वागे.
पुढें ग्रंथ राजा ! तुझें चित्त रंगे. ४२
सायंकाळीं सूर्य अस्तास जातां,
तेजाच्या रे ! कांतिचा पूर येतां,
लाली माजे रे ! कुसुंबी सभोंती.
बागे मध्यें बंगले शोभताती. ४३
पडे तेज भारी, खुले रान सारें.
इथें चालतें मंदसें गोड वारें.

Janardan Balaji Modak



खुले पालवी, जों झुले तेज तींत.
उभे वृक्ष नाना फुलें दाखवीत. ४४
पाटांत पाणी फिरतें सभोंती.
बागेस त्या सुंदर कांति येती.
मध्यें असे चौक सुरेख थोर.
चाले इथें खेळ मजेंत फार. ४५
तुझे सर्व सर्दार येती सभोंती.
पडे फार शोभा, तसे खूष होती.
पुरे खेळ आतां. पहा ! सांज झाली.
तसी सिद्ध होऊन स्वारी निघाली. ४६

आईचीभेट. वाड्यांत मातेस नमून सुज्ञ
बैसे उगां तो जणुं काय अज्ञ.
माता सती उत्तम, सुज्ञ, थोर.
आनंद मानी. मुलगा समोर. ४७
तिची प्रीति मोठी, तिचा लोभ मोठा.
तिची सौम्य मुद्रा. नसे तीस ताठा.
ह्मणे पुत्र माझा. ह्मणे सौख्य हें कीं.
खुशाले मनीं राजमुद्रा विलोकी. ४८
वाड्यावरी मंदिर भव्य आहे.
जेथें महाराज मजेंत राहे.
शोभा चढे. तेज पडे विचित्र.
भिंतीवरी वेल, अनेक चित्र. ४९

कुंड्या मजेच्या खुलती सभोंतीं.
जेथें फुलें सुंदर, दाट, येती.
हें स्थान रे ! रम्य सुरेख फार.
विश्रांति एथें मिळती अपार. ५०
तुला गोड लागे इथें बैसण्याला.
तुझें चित्त रंगे, तुला त्रास झाला.

आकासाहेबांचा मृत्यु.

सखी सुंदरी गोड आली मनांत.
मरे मावशी. हें सले आंतड्यांत. ५१
उच्छ्वास राजा मग थोर टाकी.
चित्तांत तें चित्र उभें खरें कीं.
होती सखी सोज्वळ. कांति दाटे.
भारी तिच्या हौस मनांत सांठे. ५२
तिची भव्य चर्या, तिचें भव्य रूप.
तिची ठेव नामी, खुले रंग खूप.
तिचें हास्य गोडें, तिचे भव्य डोळे.
तिच्या भाषणीं खोल चातुर्य डोले. ५३
जसा लागशी शोक तेव्हां कराया;
मला आठवे तो तुझा बोल. राया !
" जिणें व्यर्थ आहे. अहा काय माया !
अहा काय हा लोभ ! संसार वायां. ५४
येणार कीं मृत्यु. चुके कुणाला ?
आहे कसा हा भ्रम आपणाला ?

हें चित्त रंगे; क्षणिकांत गुंगे.
हा देह थंगे. मग मोक्ष भंगे. ५५
माया व्यथा ही. ममता व्यथा ही.
संसार हा शाश्वत खास नाहीं.
कांहो ! झटावें स्वहितें कराया ?
हा देह घांसो जन कार्य व्हाया. ” ५६
हें आठवे भाषण; चित्त फाटे.
रे ! तूंहि गेलासच ! दुःख मोठें.
जीं भाषणें त्वां समजून केलीं.
तीं हाय ! लागू तुज आज झालीं. ५७

स्वपत्नीवर प्रीति.

असो सर्व आतां. नसे यास तोड.
तुझी चाल नामी. नसे तीस जोड.
अरे हिंदु राजांत तूं राज थोर.
तुझी भक्ति मोठी, तुला सत्य फार. ५८
तुझा लोभ होता स्वभार्येत कैसा ?
खरा एकपत्नी. नसे अन्य ऐसा.
स्वकांतेस त्वां अर्पिला प्राण सारा.
नसे खास बाहेरचा दुष्ट वारा. ५९
त्वां एकपत्नीव्रत थोर केलें.
जें हिंदुराजांस कधीं न झालें.
झेंडा असा अल्पवयीं तुझा कीं.
त्वां कीर्ति केलीस खरीच लोकीं. ६०

स्वभाव. स्वभावें तुझ्या गोडशी रीति अंगीं.
तुझी हास्यमुद्रा तुझें चित्त सांगी.
जसें मानसीं रे ! तसें तोंड दावी.
दया, शांति, माया-मनीं हीं ! असावीं. ६१
पडे गांठ तेव्हां हसावेंस त्वां रे !
तुला गोड, राजा ! सदा रंग सारे.
तुझ्या भाषणीं गोड चातुर्य वागे.
तुझ्याशीं जरा बोलतां चित्त रंगे. ६२
तुला भीति-आज्ञा जणों राग येतो.
तुला काळजी ही-कसे तृप्त होतों.
तुझ्यारे ! पुढें कोण कीं सुज्ञ आला.
मनीं तृप्त होऊन सानंद गेला. ६३
वाटेंत गाडींत बसून जातां,
भेटे तुला सुज्ञ गृहस्थ येतां,
गाडी उभी त्वां जलदी करावी;
तीं भाषणें गोड किती निघावीं ! ६४
ताठ्यांत राजे दुसरे उगीच
लावून डोळा बसतात उंच.
डोळे न त्यांना गरिबी पहाया.
ते भोगती चैन मनांत वायां. ६५
भेटे तुला सुज्ञ गृहस्थ जेव्हां,
द्यावेंस त्वां लक्ष उदंड तेव्हां.
या, या, ह्मणावें हलवून मान.

द्यावास रे ! फार सुरेख मान. ६६

पन्हाळ्यांत वास.

उन्हाळीं पन्हाळ्यास जावेंस राजा !
जिथें मंद वारा सुटे गोड, ताजा;
जिथें रम्य छाया; जिथें वृक्ष भारी,
जिथें स्वच्छ पाणी; जिथें मौज सारी. ६७
इथें त्वां बसावें. इथें त्वां रमावें.
इथें त्वां फिरावें; तुला सौख्य व्हावें.
इथें शोभशी तूं जसा काय चंद्र.
जसा काय किंवा स्वबागेंत इंद्र. ६८
सवें गोड बाळें, वनीं त्वां शिरावें.
जणों खेळती काय मौजेंत रावे.
कधीं शूर बंदूक हातीं, निघावें.
पशु श्वापदें मारण्याला झटावें. ६९
जों जों महाराज ! शिकार केली,
तों मंडळी सर्व रमून गेली.
तों वाघ रानीं पडला समोर.
तों धांव केलीसहि त्वां हुशार. ७०
झाडी दणाणे, वन सर्व भ्यालें.
जों पारधी शूर पुढें निघाले.
तेव्हां तटाचे वरल्या कडेला
मेण्यांत राजा ! जन कोण आला ! ७१
ती सुंदरी, लोभ जिचा तुला रे !

चोरून न्ह्याळी मग खेळ सारे.
त्या सूर्यतेजें चमकून मेणा,
जो रंग, तो सुज्ञ ! मनांत आणा. ७२
खुशाले सखी गोड भार्या मनांत
जसा दूर रे ! हिंडशी तूं वनांत.
अहा ! दुष्ट काळा ! कसा घात केला !
अरे सुज्ञ राजा ! तुझा प्राण नेला. ७३

पूर्वींच्या व हल्लींच्या मराठ्यांची तुलना.

तुझ्या पूर्वजांनीं कराव्या लढाया.
शिकारी कराव्या वनीं फार. राया !
उठावें, लढावें, हणावें, कुटावें.
पुरें फक्त त्यांना महा शौर्य ठावें. ७४
रणीं त्वेष त्यांना; मनीं द्वेष त्यांच्या,
सदा पीळ अंगीं; सदा शूर वाचा.
सदा रंग मोठा; सदा हौस मोठी.
सदा धांव युद्धीं; सदा धैर्य पोटीं. ७५
त्यांच्या पोटीं हे मराठे निघाले.
ज्यांना नाहीं ठाउके शूर भाले.
ज्यांच्या चित्तीं चैन माजे उदंड,
ज्यांचें, राजा रे ! निघे फार भंड. ७६
नसे ज्ञान ज्यांना, नसे धैर्य ज्यांना,
मनीं डौल भारी. मनीं शौक नाना.
जनीं फार पीडा. जनीं त्रास भारी.

सदा गुंग भांगेत. ही चैन सारी. ७७

राजाराम महाराजांची रीति.

तूं पूर्वजांचा उचलून कित्ता
केलास रे ! लौकिक थोर आतां.
विद्या तुला लोकहितार्थ गोड.
प्रजेस सौख्यें तुज सर्व जोड. ७८

इंग्लंडची महाराणी.

स्वतांची स्थिति स्वच्छ त्वां जाणली. रे !
कुठें थोर राणी ! कुठें हिंदु सारे !
रमे लंडनीं थोर राणी मनोज्ञ.
जनीं गोड भारी, मनीं फार सुज्ञ. ७९
नृपा ! सिद्ध होशी तिला रे ! नमाया,
जिची कांति मोठी, जिला फार माया.
जिचा बाळसा शोभलासी. नृपा रे !
जिच्या प्रीति भारी मनीं रे ! भरारे. ८०

पुण्यांतील दरबार.

दर्बार झालें मग त्या पुण्यांत.
सर्दार आले बहु थोर त्यांत.
राजा ! तिथें तूं ठरशी हुशार.
देती तुला ते जन मान फार. ८१
तुझ्या भाषणें रंग केला विचित्र.
खरा तूं महा योग्यतेला सुपात्र.
तिथें सर्व सर्दार ते तृप्त झाले.
असें सुज्ञ लोकांत त्वां नांव केलें. ८२

हैस्कुलचा उत्साह.

तुझ्या राजधानींत विद्या असावी.
प्रजा सर्व राजा ! तुझी सुज्ञ व्हावी.
असा हेतु. शाळा इथें स्थापली कीं
तिचा थोर उत्साह केलास लोकीं. ८
तो भव्य, तो दिव्य नगारखाना.
नक्शी किती ! थोर किती कमाना !
तो डौल ! शोभा ! रचना खुबीची.
त्या मंदिरीं झाक विचित्र साची. ८४
भिंतींत पाषाण लखाक भारी.
अशा प्रमाणें जणुं तेज भारी.
पहा ! इथें तोंड दिसे कसें हें !
हें तेज, हा रंग विचित्र आहे. ८५
रे ! थोर उत्साह पुरा कराया
वाडा तुझा पाझळलास. राया !
तेव्हां खुले काय नगारखाना !
ज्योती निघाल्या गगनास नाना. ८६
गुण तुझे मज आठवती किती !
मधुर बोल तुझे मन पोळती.
सरळ रीति तुझी रमणीयशी.
जनहितांत सदा मन गोंवशी. ८७

सुधारणे प्रकरणीं युद्ध.

अहा ! हिंदु लोकीं कसें युद्ध चाले !
नवे कीं जुने, हे असे पक्ष झाले.
मतें दोन झालीं. सुधारा निघाला.

पहा ! जागजागीं स्वतां त्रास आला. ८८
कोणी ह्मणे नीट पुर्नविवाहा.
कोणी ह्मणे देव कशास ? आहा !
कोणी करी भक्ति महेश्वराची.
कोणी ह्मणे वैदिक रीति साची. ८९
नव्यांचा जुन्यांचा पडे द्वेष. राया,
निघे शंकराचार्य सत्ता कराया.
जुने लोक आले. नवे फार भ्याले.
नव्यांना दिला त्रास; रे! युद्ध केलें. ९०
देशाटणें फार घडेल ताप.
उल्लंघणें सिंधु खरेंच पाप.
येतां बहिष्कार घडेल दोष.
ज्ञातींत माजेल भयाण रोष. ९१
तुला ठावकें हें असे सर्व. राजा !
तरी सिंधु लंघावया धीर ताजा.
तुला वाटलें कीं नवी रीति नामी.
ह्मणालास,हे राज! "आलों पहा! मी."९२
रणीं धांवण्याला अहा ! सिद्ध होशी.
निघालास; देशाटणीं शूर जाशी.
जसा तो शिवाजी निघाला लढाया,
भराया, स्वदेशास या सोडवाया; ९३
तसा तूं निघालास, रे शूर राया !
स्वदेशास ह्या मुक्त आतां कराया.

अरे ! द्दोन वैरी जना गांजती कीं.
लठाई, भटाई पिके हिंदु लोकीं. ९४
राजा शिवाजी पहिलीस नाशी,
भोगून युद्धीं बहु दुःखराशी.
तूं सिद्ध होशी दुसरी हणाया,
रे ! शौर्य चातुर्यच गाजवाया. ९५
तो थोर योद्धा रण जिंकतो जो;
युद्धीं ह्मणे जो रणरंग माजो.
युद्धांत जो वीर पडून जातो.
विख्यात लोकीं बहु तोहि होतो. ९६
युद्धीं तुला सोज्वळ मृत्यु आला.
हे राज ! त्वां थोर उदंड केला.
लंघावया सिंधु निघून जाशी.
तूं शूर, तूं थोर मनांत येशी. ९७
राजा ! पहा हें. मतिधैर्य मुख्य.
केलेंस त्वां हें, विसरून सौख्य.
रे ! युद्ध त्वां फार विचित्र केलें.
ज्याला शिपाई रणशूर भ्याले. ९८
देशांत ह्या गोंधळ दुष्ट राहे.
मूर्खत्व एथें शिरजोर आहे.
शास्त्रार्थ मी चाल ह्मणून वागे.
चालींत खोटें विपरीत रंगे. ९९
नसे धैर्य रे ! चाल मोडावयाला.

पहा ! सर्व रे ! धर्म नासून गेला.
पुढें चालशी तूं अशा ह्या प्रसंगीं.
खरें शौर्य राजा ! तुझ्या खास अंगीं. १००
उभा तूं पुढें वीर ठेवून पाय.
रणीं मृत्यु आला, नसे रे ! उपाय.
तुझें नांव घेतां, उठे हाय हाय.
कसा त्याग केला ? महा शूर राय! १०१
अरे सिंधु लंघावया शूर जाशी.
जसा शूर जाशी, तसा तूं न येशी.
निघालास तेव्हां तुला देह होता.
पडे देह कोठें ? उरे नांव आतां. १०२
तुझें नांव गाजे पहा ! हिंदु लोकीं.
तुझी कीर्ति राहील राजा ! विलोकीं.
तुझें सर्व कर्तव्य झालें अचूक.
अधीं मृत्यु आला. नसे हेंच ठीक. १०३
नको दुःख आतां ! नको दुष्ट शोक.
चला राजमार्गें. धरा धीर. लोक !
अहा ! दाविला मार्ग आह्मास. राया !
निघूं या चलूं दुःखसिंधू तराया. १०४
हे ईश्वरा ! सर्व जगास पाळ.
राजांस आयुष्य उदंड घाल.
हा ! दीन हे केवळ हिंदुलोक.
तूं थोर, सर्वज्ञ, अगाध एक. १०५